# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

# नागरी सहकारी पतसंस्थांसाठी
# ठेव तरलता राखणेसाठीचे
# कॅश क्रेडिट कर्ज धोरण (सुधारीत)

:\Vaishu\karj Dhoran 2018\covering 2016-1.doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**४४/३ री संचालक मंडळ सभा, दिनांक ३०/०५/२०१८**
**ठराव क्रमांक : १९ (दिनांक ३०/०५/२०१८ पासून लागू )**

## नागरी सहकारी पतसंस्थांसाठी ठेवतरलता राखणेसाठीचे कॅश क्रेडिट कर्ज धोरण.

**कर्जदार संस्थांसाठी पात्रता निकष:-**

१) बँकेची सभासद असलेली नागरी सहकारी पतसंस्था या कर्जास पात्र होईल.
२) "अ" किंवा "ब" लेखापरिक्षण वर्गातील संस्था कर्ज मंजुरीस पात्र होईल.
३) नागरी पतसंस्थांना कॅश क्रेडिट ठेव तरलता कर्ज मंजुर करणेत येईल.
४) कर्ज अर्ज छाननीचे वेळी, संस्था पातळीवर **सभासद कर्ज थकबाकीचे येणेबाकीशी शेकडा प्रमाण २०% पेक्षा जास्त असणाऱ्या संस्था,** बँक कर्जास पात्र राहणार नाहीत.
५) ज्या कर्जदार संस्थांनी पुर्वीच्या बँक कर्जाची नियमित व वक्तशिर परतफेड केली आहे. अशा संस्था सदर कर्जास पात्र होतील.
६) मंजुर कर्जाचा विनियोग, केवळ ठेव तरलतेपोटीचे गुंतवणुकी व्यतिरिक्त, अन्य कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही.
७) नफ्यात व लाभांष वाटप करणारी संस्था सदर कर्जास पात्र होईल.
८) संस्थेच्या उपविधी नुसार, संचालक मंडळाची निवड झालेल्या संस्था, सदर कर्जास पात्र होतील.

- कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, प्रचलित नागरी सहकारी पतसंस्थांचे मुदत कर्ज धोरणानुसार सादर करावी लागतील.

**कर्ज मंजुरीचे निकष :**

**कर्ज मर्यादा :** कर्ज अर्ज सादर करतेवेळी, सोबत सादर केलेल्या ताळेबंदानुसार, एकुण सभासद ठेवींचे २०% इतक्या रकमेतुन, संस्थेने केलेली ठेव तरलतेपोटी अद्यावत गुंतवणुक वजा, जाता उर्वरीत रकमे इतकी, कर्ज मर्यादा मंजुर केली जाईल. सदर कर्ज रक्कम मंजुर करताना संस्थेची आर्थिक स्थिती, मासिक वसुली व परतफेड क्षमता इत्यादीबाबी विचारात घेण्यात येईल.

**कर्जाचा प्रकार :** कॅश क्रेडिट कर्ज, १ वर्षे मुदतीने (प्रत्येक वर्षी नुतनीकरणाच्या अटीवर, कोणत्याही संस्थेस फक्त दोन वेळेस नुतनीकरण देण्यात येईल.)

**कर्जाचा व्याजदर :** ठेव तरलता राखणेसाठी कॅश क्रेडिट कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे.८.५०% इतका राहिल.

**कर्ज उचलीचे वेळी घ्यावयाची कागदपत्रे :**

१) नमुना सही कार्ड २) वचनचिठ्ठी ३) सातत्य हमीपत्र ४) अटी मान्यतेचे करारपत्र ५) परत न घेता येणारे इतर बँकेच्या खात्यावर नावे टाकण्याचे अधिकार पत्र ६) चालु / बचत खात्यावर नावे टाकण्याचे अधिकार पत्र ७) कर्ज उचली संबंधीचे ठराव (संस्थेच्या लेटर हेडवर, मुदत कर्ज धोरणानुसारचे विहीत नमुन्यात) ८) कर्ज परतफेडीस, वैयक्तिक व सामुहिक जबाबदार

असले संबंधी हमीपत्र ९) संचालकांचे के.वाय.सी. नुसारची कागदपत्रे, वास्तव्याचे नोकरी / व्यवसायाचे / गावचे दुरध्वनी क्रमांकासह पत्त्यांची यादी. १०) अद्यावत अर्थिक पत्रके व सभासद कर्ज येणेबाकी थकबाकी यादी.

**सुधारीत कर्ज उचल प्रक्रिया :-** कर्ज मंजूरी पत्र शाखेस प्राप्त झालेनंतर कर्ज उचलीसाठीचे आवश्यक ठराव तसेच दस्तऐवज (नियमानुसार फ्रँकींग झालेले) शाखेस सादर केलेनंतर मंजूर कर्जाची रक्कम कॅश क्रेडिट (Cash Credit Liquidity Purpose) खात्यावर नावे टाकून संस्थेचे नविन चालू तरलता खाते (Current Account Liquidity Purpose) उघडून त्यामध्ये वर्ग करण्यात यावी.

वरील प्रमाणे कार्यवाही केलेनंतर संस्थेकडून दरमहा रोख राखीव तरलता (CRR) व वैधानिक ठेव तरलता (SLR) याची स्टेटमेंट संस्थेच्या ठरावासह घेऊन त्यानुसार संस्थेने वैधानिक ठेवतरलता राखली असल्याची खातरजमा केल्यानंतर संस्थेने ठेव तरलतेच्या कर्जाची परतफेड केलेली रक्कम संस्थेच्या मागणीनुसार त्यांचे चालू खात्यावर वर्ग करण्यात यावी अथवा तरलतेपोटी गुंतवणूक करण्यात यावी.

**कर्ज परतफेड प्रक्रिया :** संस्थेच्या कर्ज खात्यावर व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल. सदरचे व्याज त्वरीत भरणा करावे लागेल. संस्थेस मंजूर केलेल्या एकूण कर्ज रक्कमेचा भरणा ३६ महिन्यामध्ये करावायचा असून त्यासाठी प्रत्येक १२ महिन्यानंतर त्याप्रमाणात कर्जाची मंजूर मर्यादा कमी करुन त्याप्रमाणे ड्राविंग पॉवर टाकण्यात येईल. सदरचे खाते ३ वर्षामध्ये निरंक करण्यात येईल.

**अटी / शर्ती :**

१) संस्थेने राखीव निधीची गुंतवणुक स्वतंत्ररित्या या बँकेच्या मुदत ठेवीत केल्यानंतरच मंजुर कर्जाची उचल दिली जाईल.

२) संस्थेने उपविधीनुसार रोख तरलताप्रमाण (CRR) व वैधानिक तरलता निधी (SLR) प्रमाण राखणे बंधनकारक राहील. दर तिमाहीस सदरचे स्टेटमेंट शाखेस सादर करावे लागेल.

३) बँक कर्ज परतफेडीस, संस्थेचे पदाधिकारी व पंच कमिटी सदस्य जॉईन्ट ॲण्ड सेव्हरली जबाबदार रहातील. अशा आशयाचा हमी करार बँकेस करुन द्यावयास पाहिजे. बँक कर्जबाकी असताना, संस्थेच्या पंच कमिटी सदस्यामध्ये बदल झाल्यास सदर हमीकरार नव्याने बँकेस करुन द्यावा लागेल.

४) संस्थेची त्रैमासिक, संपतिक परिस्थिती दर्शक पत्रके (उदा. तेरीज, नफा-तोटा पत्रके, ताळेबंद पत्रक, सभासद कर्ज येणेबाकीसह थकबाकी याच्या शाखेस सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक पत्रके विहित मुदतीत सादर न केल्यास नियमानुसार बँकेने वेळोवेळी निश्चित केलेले चार्जेस संस्थेच्य खात्यावर नावे टाकुन वसुल केले जातील.

५) व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल असे होणारे व्याज संस्थेच्या खात्यावर नावे टाकुन वसुल केले जाईल.

६) संस्थेच्या हिशेबाची पुस्तके व इतर कागदपत्रे, दप्तरी कामकाज, नियमित / प्रासंगिक / आवश्यकतेनुसार तपासण्याचा अधिकार बँकेस राहील.

७) थकीत कर्ज हप्त्यावर द.सा.द.शे.२% दराने जाद दंडाचे व्याज आकारणेत येईल.

८) बँक कर्जाचा विनियोग केवळ ठेव तरलतेपोटी गुंतवणुकीसाठीच करता येईल.

९) कर्ज कालावधीत स्वनिधी व ठेवी यामध्ये घट करता कामा नये. तसा हमी ठराव बँकेस करुन द्यावा लागेल.

१०) संस्थेची अन्य बँकांतील खाती कर्ज उचल करणेपुर्वी त्वरीत बंद करावी लागतील. मुदत ठेवीच्या बाबतीत मुदतीअंती सदरील ठेवी या बँकेत वर्ग करणेसंबंधी हमी ठराव उचलीचे वेळी शाखेस सादर करुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

११) बँक कर्जाचा हप्ता दरमहा २० तारखेपुर्वी संस्थेच्या चालु ठेव खात्यात नावे टाकुन वसुल करणेचा अधिकार बँकेस राहील.

१२) संस्थेने एकही मासिक कर्ज परतफेड हफ्ता थकीत केल्यास संपुर्ण कर्ज एकरकमी व्याजासह परत मागण्याचा अधिकार बँक राखुन ठेवीत आहे.

१३) सहकार खात्याने ९७ व्या घटनादुरुस्ती नुसार मंजुर झालेले आदर्श पोट नियम संस्थेने स्विकारले पाहिजे.

१४) संस्थेने सर्व प्रकारच्या विमा पॉलिसी घेणे आवश्यक राहील.

१५) बँक कर्ज परतफेड होईपर्यंत कार्यालयीन जागेत बदल केला जाणार नाही. याची हमी ठरावाद्वारे द्यावी लागेल. कार्यालयीन जागेत बदल करावयाचा झाल्यास बँकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

१६) वरील पैकी कोणत्याही अटीचे समाधानकारक पालन होत नसल्याचे आढळुन आल्यास कर्ज खात्यावरील येणेबाकी व्याजासह परत मागण्याचा अधिकार बँक राखुन ठेवीत आहे.

१७) वरील पैकी कोणत्याही अटीत बदल करण्याचा वगळण्याचा अगर जादा अट समाविष्ट करण्याचा अधिकार बँकेस राहील.